जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक - ३२० दिनांक -१४/०८/२०२४

शिवाजीनगर पोलीस स्टेशन पुणे

**प्राणघातक हल्ल्यामधील १८ महिन्यापासून पाहिजे असलेला सराईत गुन्हेगारास केले जेरबंद**

दिनांक १२/०८/२०२४ रोजी शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीत मा.वरिष्ठांच्या आदेशा अन्वये गुन्हे प्रतिबंधक पेट्रोलिंग करत मनपा बस स्टॉप भागात पेट्रोलिंग करीत असताना पोउपनि. अजित बडे, व स्टाफ शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीतील मनपा बस स्टॉप येथे आले असता पोलीस अंमलदार जाधव व पोलीस अंमलदार वलटे यांना गुप्त बातमीदारांमार्फत माहिती मिळाली की,शिवाजीनगर पोलीस ठाणे गुन्हा रजि.नंबर ५२/२०२३ भादंवि.कलम ३०७,१२० ब,३५१,५०४,आर्म ॲक्ट कलम ४(२५), मपोका. कलम ३७(१)सह १३५ प्रमाणे दाखल गुन्ह्यातील पाहिजे आरोपी धनंजय गावडे हा त्याच्या राहते घराजवळ आलेला आहे.

सदर बातमीची खात्री करुन कायदेशीर कारवाई करण्याबाबत आदेश दिल्याने आम्ही स्वतः व पोलीस स्टाफसह आरोपी धनंजय गावडे याचे राहते घराजवळ जाऊन सापळा रचून त्यास जागीच पोलीस स्टाफच्या मदतीने पकडून त्यास त्याचा पुर्ण नाव पत्ता विचारता त्याचे नाव **धनंजय राजेंद्र गावडे वय ३० वर्ष रा. न.ता.वाडी,शिवाजीनगर पुणे** असे असल्याचे सांगितले.त्याच्याकडे दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने तपास केला असता त्याने दाखल गुन्हा केला असल्याची कबुली दिली आहे. त्यास दाखल गुन्ह्यात. अटक करण्यात आली असुन त्याचेवर विविध पोलीस स्टेशनला गुन्हे दाखल आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त श्री.संदिप सिह गिल, मा.सहा.पोलीस आयुक्त श्री.साईनाथ ठोंबरे यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.चंद्रशेखर सावंत, पोउपनि. अजित बडे,पोलीस अंमलदार दिपक चव्हाण,पोलीस अंमलदार प्रमोद मोहिते, पोलीस अंमलदार सचिन जाधव, पोलीस अंमलदार महावीर वलटे यांनी केली आहे.